सत्र खटला क्र. ७२/२०२३
सरकार -वि- आकाश
<u>निशाणी क्रमांक - ४५</u>

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र.०२ याची जबानी</u>**

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की

**माझे नांव – राजु भिकुदास बावस्कर**

**वय - ३५ वर्ष, व्यवसाय – शेती**

**राहणार - शिवाजी नगर, मलकापूर, जि. बुलढाणा**

**<u>अभियोग पक्षातर्फे सरतपास विधिज्ञ श्री. एस. एच. जोशी</u>**

०१. मी फिर्यादीला व आरोपीला ओळखत नाही. घटना २ वर्षापुर्वी मुक्ताईनगर रस्त्यावर चारखंबा चौकामध्ये घडली होती. त्यावेळी मी घरी होतो. मी घटनास्थळावर आलो त्यावेळी बसचालक व इतर व्यक्तीमध्ये बोलाचाल चालु होती. मी घटनास्थळावर आल्यानंतर ते निघून गेले. याव्यतिरीक्त माझ्यासमक्ष काही घडले नाही. पोलीसांनी माझा जबाब नोंदविला नाही. असे काही घडले नाही की, मी घटनास्थळावर पोहचलो त्यावेळी एस.टी. बस चालक व डस्टर वाहन चालकामध्ये बोलाचाल व शिवीगाळ झाली व त्यांच्यामधील भांडण मी व एस.टी. बस वाहक व इतर लोकांनी सोडविले.

***(साक्षीदार अभियोग पक्षाला मदत करत नसल्याने सरकारी वकीलांनी त्याला फितूर घोषित करून उलट तपास करण्याची परवाणगी मागीतली ती देण्यात आली.)***

**<u>उलटतपास सरकारी वकीलांमार्फत</u>**

०२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २३/०५/२०२३ रोजी दुपारी ०४.३० वाजता मी घरी असतांना भांडणाचा आवाज ऐकुन रस्त्यावर आलो व त्यावेळी एस.टी. बस चालक व डस्टर वाहनचालकामध्ये बोलाचाल होऊन डस्टर चालकाने त्याला शिवीगाळ करून चापट बुक्क्यांनी मारहाण केली व सदर भांडण मी व इतर प्रवासी व एस.टी. बस वाहकाने सोडविले. माझ्या जबाबातील अधोरेखांकित भाग अ मला वाचून

दाखविला. तो मी पोलीसांना सांगितला नाही. सदर अधोरेखांकित भाग अ पोलीसांनी माझ्या जबाबामध्ये का लिहला आहे याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस. एस. मोरे**

नाकारला.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

दिनांक - २०/०१/२०२६

Digitally signed by RAJENDRAKUMAR BABASAHEB GIRI
Date: 2026.01.20 13:47:17 +0545

**(आर. बी. गिरी)**

अतिरिक्त सत्र न्यायाधीश मलकापूर

## CERTIFICATE

I certify that this order P.D.F. uploaded is a true and correct copy of original signed order.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | : | Adhoc District Judge – 1 & Additional Sessions Judge, Malkapur. |
| Name of Stenographer | : | Shri. A. R. Chatur. (Senior Clerk) |
| Date of order | : | 20.01.2026 |
| Date of signed on order by Judicial Officer | : | 20.01.2026 |
| Date of uploading | : | 20.01.2026 |